**अत्यंत महत्वाचे**
**बदल्या-२०१९**

क्र/यजिप/साप्रवि/आस्था-४/कावि-११८९ /२०१९
यवतमाळ जिल्हा परिषद,यवतमाळ.
सामान्य प्रशासन विभाग
यवतमाळ दिनांक- २०/५/२०१९

प्रति,

१) ----------------------------------------(सर्व विभाग प्रमुख)
जिल्हा परिषद,यवतमाळ
२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती -------------- (सर्व)

विषय :- **सा.प्र.वि.विभागांतर्गत वर्ग-३ च्या नियतकालीन प्रशासकीय बदलीबाबतची अंतीम ज्येष्ठता यादी प्रसिध्द करणेबाबत.**

संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्रमांक/यजिप/साप्रवि/आस्था-४/वशि/१०३२/२०१९
दिनांक ०२/०५/२०१९

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये, साप्रवि संवर्गाच्या वर्ग-३ कर्मचा-यांच्या सन २०१९ या वर्षाचे प्रशासकीय बदलीबाबतची तात्पुरती वास्तव्य सेवा कालावधीची ज्येष्ठता यादी जि.प.यवतमाळ च्या संकेतस्थळावर व कार्यालयाच्या ई-मेल वर पाठविण्यात आलेली होती. सदर यादीवर दिनांक ९/५/२०१९ पर्यंत आक्षेप मागविण्यात आलेले होते. प्राप्त झालेल्या आक्षेपाच्या अनुषंगाने तात्पुरत्या सेवा कालावधीच्या जेष्ठता यादीत दुरुस्ती करुन याव्दारे अंतीम वास्तव्य सेवा कालावधीची ज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर अंतीम यादी जिल्हा परिषद यवतमाळ च्या zpyavatmal@gov.in या संकेस्तळावर प्रसिध्द करण्यात येत असून ई-मेल व्दारे विभाग प्रमुख व गट विकास अधिकारी यांना पाठविण्यात येत आहे. सदर यादी संबंधीत संवर्गातील संबंधीत कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी. यादीनुसार सुट पात्र कर्मचा-यांना बदलीकरिता समुपदेशाच्या दिवशी आवश्यक कागदपत्र/पुराव्यासह उपस्थित राहण्याच्याही सुचना दयाव्यात. बदलीसंदर्भात सुट पात्र कर्मचा-यांने आवश्यक पुरावे सादर न केल्यास व अशा कर्मचा-याची बदली झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत कर्मचा-याची राहील,याची संबंधीतांना जाणीव करुन दयावी.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)**
**जिल्हा परिषद,यवतमाळ**

प्रतिलीपी :-

१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,यवतमाळ यांना माहितीकरिता सविनय सादर.
२) सहा.प्रशासन अधिकारी/कनिष्ठ प्रशासन अधिकारी/संबंधीत लिपीक ------------------ यांना वरील प्रमाणे माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषीत.